**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** पांडुरंग गोविंद गुरव.

**वय** - ५९ वर्ष, **व्यवसाय** - सेवानिवृत्त सहा. फौजदार,

**रा.-** हरपवडे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

**१.** मी सन २०१६ ते २०२३ पर्यंत आजरा पोलिस ठाण्यात हवालदार या पदावरती कार्यरत होतो. दि.२८.०६.२०२२ रोजी मी पोलिस ठाण्यात हजर असताना मला पो. नि. यांच्या आदेशाने सदर गुन्हा तपासासाठी देण्यात आला होता. आता मला तो आदेश दाखवला, त्याला **नि. क्र. पी.–३०** देण्यात येतो. मला आदेशा सोबत फिर्यादी जबाब, एफ. आय. आर. प्रत आणि इतर कागदपत्रे मिळाली होती.

**२.** मी त्याप्रमाणे दि.३०.०६.२०२२ रोजी दोन पंचांसमक्ष फिर्यादीने दाखवलेल्या घटनास्थळाचा पंचनामा आणि समजुतीचा नकाशा तयार करून गुन्हयात वापरलेला कोळप्याचा लाकडी दांडा जप्त केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला, त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावरती माझ्या व पंचाच्या स्वाक्ष–या आहेत. त्याला **नि. क्र. ३१** देण्यात येतो. मला घटनास्थळावरून जप्त केलेला लाकडी दांडा दाखवल्यास ओळखता येवू शकतो. आता मला तो दांडा दाखवला, तो तोच आहे. त्याला वस्तू क्रं. अ देण्यात आलेला आहे.

**३.** त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्या प्रमाणे नोंदवले होते. मी सा.क्र. ४ आणि सा.क्र.५ चा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. आता मला त्यांच्या जबाबातील आधोरेखांकीत भाग अ वाचून दाखवले. मी ते त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले आहे. त्यांना अनुक्रमे **नि. क्र. ३२ व ३३** देण्यात येतात. त्यानंतर मी पुढे तपासकामी जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळवण्याबाबत सरकारी दावखान्यातील डॉक्टरांना पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखवले त्याला **नि.क्र. ३४** देण्यात येतो.

**४.** मला तपासाअंती आरोपीनीं फिर्यादीला डोक्यात लाकडी दांडयांने व लाथा बुक्क्यानीं मारहाण करून डाव्या कानाखाली व पायावरती दुखापत करून पुन्हा पैसे

मागितल्यास शिवीगाळी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे निष्पन्न झाले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – श्री. डी.जे. देसाई वकील.</u>**

**५.** हे म्हणणे खरे नाही की, मी दि. ३०.०६.२०२२ रोजी घटनास्थाळाचा पंचनामा करून लाकडी दांडा जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी न जाता पोलीस ठाण्यात बसून खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व आरोपी मध्ये पैश्यांची कोणतीही देवाणघेवाण झाली नव्हती.

**६.** घटनेच्या दिवशी आरोपी जनावरे खरेदी करण्यासाठी निंगूडगे येथे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी फिर्यादी तेथून त्यांची जनावरे पाणी पाजण्यासाठी घेवून जात होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपींच्या म्हैसीने बुजाल्यामुळे फिर्यादीला ढकलत नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादी जखमी झाला असता. त्याने आरोपी विरोधात खोटी तक्रार दाखल केली आहे.

**७.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला लाकडी दांडयाने डोक्यात व पायावरती मारहाण करून जखमी केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळी करून कधीही जिवे मारण्याची धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदार क्र. ४ व ५ यांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात पंचाच्यां स्वाक्ष–या घेतल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नसताना मी खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

दिनांक – २२.०५.२०२५.
आजरा.

(आर. पी. थोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.